Prabhat Kids
प्रभातायण
एक कौटुंबिक स्नेहसंवाद
PRABHAT KIDS SCHOOL
(CBSE Affi. No.: 1130426)
FOR INTERNAL CIRCULATION ONLY
8th October, 2025




# सायबर सेफ्टी क्लबचा सायबर जागृततेसाठी पुढाकार

## जाणीव जागृतीसाठी प्रयत्न

## सायबर सेफ्टी क्लबची स्थापना

## विविध प्रकल्पांचे आयोजन



प्रभात वृत्तसंवाद

**सद्यस्थितीत ऑनलाईनच्या माध्यमातून होणारी आर्थिक, मानसिक, शारीरिक फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. एका लिंकवर क्लिक झाल्याबरोबर किंवा गेम खेळत असताना अकाऊंटमधील संपूर्ण रक्कम काढल्या गेल्याचा मॅसेज येतो आणि हिच आर्थिक पिळवणूक म्हणजेच सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात विद्यार्थी किंवा पालक अडकू नये त्यासंदर्भात जनजागृती व्हावी ह्या उद्देशाने प्रभात किड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनीच सायबर क्लबची स्थापना केली.**

प्रभात किड्स स्कूलच्या प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे यांच्या मार्गदर्शनात ऋतुराज गावंडे, ऋतीका वांदे, सुज्वल चव्हाण, अद्वित उजाडे, सनी ढवळे, प्रियल बुंदेले, आहना गिनोडे, सिद्धार्थ झांबड, गार्गी गावंडे, शौनक शिंगरुप, उत्कर्ष देशपांडे, तनिष्क कोरडे, मेघा भाटीया, नील अंभोरे, गार्गी शिंदे, अर्पण ददगल, कनक अग्रवाल, मित गोडा, जान्हवी मसके, क्रितीक शुक्ला, युतिका भट्ट, चिंतन जिवानी, तनिष्का देशमुख, पार्थ देशमुख, श्रावणी कवळकार, वैष्णवी दोरकर, आयुष सावळे, स्वरा देशमुख व क्षितीज मेहरे इत्यादी विद्यार्थी सायबर क्लबचे सदस्य या नात्याने माईम, पथनाट्य, वाद-विवाद, सायबर सेफ्टी संदर्भात प्रश्नमंजुषा, कथा-




















कथने, सायबर सेफ्टी कार्यशाळा, ग्रुप डिस्कर्शन, फलक प्रदर्शनी असे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. पालक सभेच्या दिवशी पालकांमध्ये सायबर सेफ्टी संदर्भात जागृकता निर्माण करण्याच्या हेतूने फलक प्रदर्शनीच्या माध्यमातून तसेच पालकांशी थेट संवाद साधून किंवा विविध प्रकल्पांचे आयोजन केल्या जाते. प्रभात किड्स स्कूलच्या ह्या अभिनव उपक्रमाने सायबर गुन्ह्यांपासून सावधगिरी बाळगण्यासंदर्भात नक्कीच विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये जागृती निर्माण होईल आणि यासाठी आम्ही असे प्रकल्प पुढेही घेणार आहोत, असे सायबर क्लबच्या सर्व विद्यार्थ्यांनी सांगितले.